**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 7 (        ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेतंर्गत असलेल्या स्वामी विवेकानंद अभ्यास व संशोधन केंद्राच्या वतीने मंगळवार, दि. 11 सप्टेंबर रोजी निवृत्त मे.जनरल डॉ.जी.डी.बक्षी यांचे `भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हाने, विशेष संदर्भ सीमेपलिकडील दहशतवाद` या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात सकाळी 10 वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे राहतील. `भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील समकालीन आव्हाने` तसेच `भारताची दहशतवाद विरोधात असणारी संरक्षण यंत्रणा ` या विषयावर डॉ.बक्षी हे आपले मत मांडणार आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा.अनिल डोंगरे व केंद्राचे विभागप्रमुख प्रा.आर.बी.गोरे यांनी केले आहे

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 7 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी